पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 21/11/2019 (गुरूवार)
(सकाळ)

---

## जबर दुखापत

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर गॅलेक्सी वाईन शॉप जवळ येथे दिनांक 19/11/2019 चे 21:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गौतम गुड्डू पासवान, वय 25 वर्षे रा. वैशाली नगर, नागपूर हा इंडोरामा कंपनी गेट क्र. 3 समोरील गॅलेक्सी वाईन शॉप जवळ अंड्याचे ठेल्यावर पाचशे रूप्याचे चिल्लर मागायला गेला होता. दरम्यान आरोपी नामे– निकेश त्याचे 3 साथीदारांसह संगणमत करून फिर्यादी सोबत वाद घालून आरोपी नामे– निकेश याने त्याचे हातातील कड्याने फिर्यादीचे डोक्यावर मारले व त्याचे 3 साथीदारांनी हातबुक्कीन मारहाण करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 326, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिनकर दराडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर